| |
|---|
| दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पी.सी.एम.सी. न्यायालय, आकुर्डी, पुणे यांचे न्यायालयासमोर |
| रे. दि. मु. नं. १९/२०२० सीएनआर नं.एमएचपीयु–१०–०००१२०–२०२० |
| श्री. युवराज बाळु लांडगे व इतर |
| वि. |
| पिंपरी चिंचवड महानगरपालिका व इतर |

**आदेश निशाणी क्र. ७२ खालील आदेश.**
**(दिनांक २२/११/२०२४ रोजी पारित)**

१. सदरचा अर्ज हा वादीने अतिरिक्त पुराव्याचे प्रतिज्ञापत्र सादर करण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. सदरहु अर्जावर प्रतिवादी यांचे म्हणणे मागविले. त्यांनी त्यांचे म्हणणे अर्जाच्या पाठीमागे दिलेले आहे.

३. वादीतर्फे अधिवक्ता श्री. व्ही. आर. पाटील यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. प्रतिवादीतर्फे कोणही हजर नाही. त्यामुळे त्यांचे युक्तीवादाशिवाय प्रकरण पुढे चालविण्यात आले.

४. सदरहु अर्जाद्वारे वादीनी असा युक्तीवाद केला की, त्यांनी न्यायालयात वादीचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दिनांक १६/११/२०२२ रोजी दाखल केले. त्यांचा सरतपास होवुन प्रतिवादी यांनी उलटतपास सुध्दा घेतला आहे. मात्र त्यावेळी वादी यांचेकडुन काही महत्वाचे कागदपत्र दाखल करायचे राहुन गेले. त्यांचे युक्तीवादानुसार वादी यांचेविरुध्द दावा मिळकत वर्णन केलेले स.नं.१३८/१/१ याबाबत श्री. गजानन काळुराम फुगे व इतर यांनी मे. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पिंपरी येथे रे.मु.नं.४२/०९ दाखल केला होता. तो सुध्दा न्यायप्रविष्ठ आहे. सदर दाव्यात अधिकचे प्रतिज्ञापत्र वादी यांना पुराव्याकामी दाखल करावयाचा आहे. तरी तशी

परवानगी मिळावी अशी विनंती केली.

**५.** संपूर्ण अभिलेख पाहिला. सदरचा दावा हा वादीने ठराव, आदेशात्मक मनाई हुकूम व बेकायदेशीर बांधकाम काढुन टाकण्याकरिता तसेच निरंतर मनाई हुकूम मिळण्याकरिता दाखल केला आहे. सदर दाव्यात वादीने त्याचे पुराव्याचे शपथपत्र दिनांक १६/११/२०२२ रोजी दाखल केले होते त्यावर प्रतिवादीने वादीचा उलटतपास दिनांक १५/०४/२०२३ व दिनांक ०९/०८/२०२३ रोजी घेतला होता. त्यानंतर जवळपास एक वर्षानंतर वादीने सदरचा अर्ज अतिरिक्त पुराव्याचे शपथपत्र दाखल करण्याकरिता केला की, ज्याद्वारे वादी हा स.नं.१३८/१/१ मिळकतीबाबत गजानन काळुराम फुगे व इतर यांनी रे.मु.नं.४२/०९ पिंपरी येथील न्यायालयात दाखल केला आहे, त्याविषयी कथन प्रमाणित प्रत दाखल करु इच्छीतात. मात्र सदर रे.मु.नं. ४२/०९ विषयी सदर दाव्यात कुठेही कथन (Pleading) नाही. वास्तविकतः सदरचा रे.मु.नं. ४२/०९ हा अगोदरच दाखल झालेला आहे व अजुन न्यायप्रविष्ठ आहे व अशा स्थीतीत वादीने त्या विषयीची माहीती मुळ दाव्यात देणे जरुरीचे होते परंतु तसे नमुदच केले नाही. त्यामुळे आता वादीस अतिरिक्त शपथपत्र दाखल करण्यास परवानगी देणे हे इष्ट होणार नाही. तसेच उलटतपास होवुन बराच अवधी झालेला आहे. अशा स्थीतीत अर्ज नामंजूर करणे इष्ट होईल म्हणुन खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

वादीचा अर्ज (निशाणी क्र.७२) नामंजुर करण्यात येतो.

VINOD SANTOSH DAMARE

Digitally signed by VINOD SANTOSH DAMARE
Date: 2024.11.22 16:09:19 +0530

आकुर्डी, पुणे. (व्ही. एस. डामरे)

दिनांक २२/११/२०२४ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, आकुर्डी, पुणे.

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File of judgment/order are word to word as per original judgment/order.

Name of Stenographer : P. B. Jadhav.

Name of court : C.J.J.D. PCMC Court, Akurdi, Pune.